**प्रेसनोट**

ला.प्र.वि, अमरावती
दिनांक :२०.०५.२०२४

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचेनाव | लाचलुचपत प्रतिबंध विभाग, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १)सौ.जसमाय छोटेलाल मावस्कर, वय ३८ वर्ष,पद सरपंच, ग्रामपंचायत अढाव, पोस्ट—तावुबांदा ता.चिखलदरा, जि. अमरावती. २)छोटेलाल सोनाजी मावस्कर,वय ४२ वर्ष,व्यवसाय — शेती,रा. ग्रामपंचायत अढाव, पोस्ट — तावुबांदा ता.चिखलदरा,, जि. अमरावती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | २०/०५/२०२४ चे १४/१३ ते १४/५३ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केलीली रक्कम | २५,०००—रुपये |
| ५ | तडजोडी अंती मागणी केलेली लाच रक्कम | २०;०००/— रूपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | २०,०००/—रुपये |
| | घटनास्थळ | बॅक ऑफ महाराष्ट्र शाखा,बिजुधावडी समोर, ता.धारणी, जि.अमरावती |

थोडक्यात हकीकत — दिनांक १६/०५/२०२४ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. कार्यालय अमरावती येथे येवून तक्रार दिली की,यातील तक्रारदार यांना सन २०२० पासुन राहणीमान भत्ता नव्हता. त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक ०२/०५/२०२४ रोजी राहणीमान भत्ता मिळणेकरिता ग्रामपंचायत अढाव यांचेकडे अर्ज केला होता. तक्रारदार याचे राहणीमान भत्त्याचे चेकवर स्वाक्षरी करण्याकरिता तक्रारदार हे संरपंच सौ.जसमाय छोटेलाल मावस्कर यांचेकडे गेले असता सरपंच सौ.मावस्कर यांनी चेकवर सही करण्यासाठी तक्रारदार यांना २५०००/— रूपयाची मागणी केली

सदर तक्रारीवरून दिनांक १७/०५/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान सरपंच सौ.जसमाय छोटेलाल मावस्कर यांनी २५०००/— रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक २०/०५/२०२४ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान सौ. जसमाय छोटेलाल मावस्कर सरपंच अढाव ग्रामपंचायत व श्री.छोटेलाल मावस्कर सरपंच यांचे पती यांनी तक्रारदार यांचेकडून तडजोडीअंती मागणी केलेली २०,०००/— रूपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. नमुद दोन्ही आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन धारणी अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदर कार्यवाही मा.श्री.मारोती जगताप, पोलीस अधीक्षक,ला.प्र.वि अमरावती परिक्षेत्र अमरावती, मा. श्री.अनिल पवार, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती, पोलीस उपअधीक्षक मिलींदकुमार बहाकर, पोलीस उपअधीक्षक मंगेश मोहोड यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस निरीक्षक शिल्पा भरडे. सह पोलीस निरीक्षक सतिश उमरे, पो.हवा.प्रमोद रायपुरे, म.पो.हवा.विद्या राउत, पोलीस अंमलदार शैलेश कडू, चालक पोउपनि बारबुध्दे यांनी पार पाडली.

नागरिकांनी अशाचप्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क — लाचलुचपत प्रतिबंध विभाग, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
कार्यालय फोन नं. ०७२१—२५५२३५५
टोल फ्री क्रमांक १६४

(शिल्पा भरडे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. अमरावती